# महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कर्तव्याचा तपशिल

**मुद्दा क्रं. १**

**१. प्राचार्यांची कर्तव्ये:-**

**(१) शैक्षणिक बाबीसंबंधी कर्तव्ये :-**

(अ) त्यांच्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षण व शारीरीक सक्षमतेने व प्रभवीपणे होण्यासाठी सामान्यता जबाबदार असेल.

(ब) महाविद्यालयात वक्तशीरपणे हजर राहील, नेमुन दिलेल्या महाविद्यालयातील तासांमध्ये शाळेत उपस्थित राहील. महाविद्यालयातील कामाकडे पुर्णपणे लक्ष देईल, आणि महाविद्यालयातील तासांमध्ये कोणतेही खाजगी काम करणार नाही.

(क) प्राध्यपकांच्या कामाचे प्रमाण नियमित व नियंत्रित करील आणि महाविद्यालयातील शिक्षणाचा दर्जा राखण्यास जबाबदार असेल.

(ड) नियोजने व मुल्यमापने या संबंधात स्थुल मार्गदर्शन तत्वांची तरतुद करण्यास जबाबदार असेल.

(ग) दिशा निदेशन पाठ्यक्रम (Orientation Cources) शिकुन घेईल व ते यशस्वीरीत्या पुर्ण करील.

(ह) विद्यापीठाअंतर्गत घेण्यात येणाऱ्या परिक्षांमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगीरी सातत्याने उत्कृष्ठ दर्जाची राहील.